# महाराष्ट्र शासन- आरोग्य सेवा

## (जाहिरात)

अकोला जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत आरोग्य विभाग जि.प.अकोला या कार्यालयाचे अधिनस्त सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकिय अधिकारी महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकिय अधिका-यांची **०५ रिक्त पदे** तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांचे नेमणूकीचे स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याचे कालावधीसाठी भरावयाची असून, विहीत शैक्षणीक अर्हताधारक उमेदवारांनी खालील अटीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**<u>अटी व शर्ती खालील प्रमाणे</u>**

१) पदाचे नांवः- तदर्थ वैद्यकिय अधिकारी म.वै.आ.से गट-अ

२) शैक्षणीक अर्हता :-

  अ) एम.बी.बी.एस अर्हता

३) वयोमर्यादाः- मुलाखतीचे दिनांकास वय ५६ वर्ष पेक्षा जास्त नसावे.

स्पष्टीकरणः- कंत्राटी तत्वावर काम करित असतांना कोणत्याही प्रकारे भविष्यात कायमस्वरुपी अथवा नियमित नेमणूक मिळणार नाही व उमेदवाराने तसे गृहीत धरु नये अथवा कंत्राटी नियुक्तीवरील उमेदवार तसा हक्क मागू शकणार नाही. नियमित सेवेतील उमेदवार उपलब्ध झाल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता तदर्थ वैद्यकिय अधिका-यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. मुलाखती दिलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना अकोला जिल्हयांतर्गत कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात निकड लक्षात घेवून वैद्यकिय अधिकारी गट-अ हया पदावर कंत्राटी तत्वावर नेमणूक दिली जाईल. या करिता इच्छूक उमेदवारांनी या कार्यालयाकडुन विहीत केलेल्या दिनांकाला मुलाखतीचे दिवशी अर्ज करुन मुळ शैक्षणीक व इतर आवश्यक दस्ताऐवजासह/ प्रमाणपत्रासह मुलाखतीला प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक राहील.

शासन निर्णय क्रं.मवैअ-१०५४/ प्र.क्र.२४१/ सेवा-३ दि. ०२.०३.२०१५ मध्ये नमूद केल्या प्रमाणे एम.बी. बी.एस. पात्रता धारकांना इतर भागा करिता ७५०००/- इतके एकत्रीत दरमहा मानधन दिले जाईल.

| | |
|---|---|
| टिप १) | :-अर्जासोबत फोटो, शैक्षणीक अर्हता, ( तिन्ही वर्षाचे गुणपत्रीका) प्रयत्न प्रमाणपत्र, व यासंबधी दाखला, महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे/भारतीय वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, आंतरसावीयता प्रमाणपत्र, असल्यास अनुभव, तसेच मागास वर्गीय असल्यास तत्संबंधी जातीचा दाखला, जातपडताळणी वैद्यता प्रमाणपत्र साक्षांकित देणे आवश्यक राहील. |
| टिप २) | :- नियुक्तीसाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांनी अर्जासह टिप १ मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण कागदपत्राच्या साक्षाकिंत छायाप्रतीचे संचासह अर्ज सादर करावा या कार्यालयाकडुन कळविण्यांत आलेल्या दिवशी मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. उमेदवारास मुलाखतीसाठी वेगळे मुलाखतपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| टिप ३ | :- उमेदवारांनी मुलाखतीचे दिवशी मुळ प्रमाणपत्रासह या कार्यालयाकडुन कळविण्यात आलेल्या दिनांकाला हजर राहणे आवश्यक राहील. पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल.अपात्र ठरल्यास, मुलाखतीचे वेळीच त्यांना त्रृटी कळविल्या जातील, या बाबत पुन्हा वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. या बाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. |
| टिप ४) | मुलाखतीचे दिनांक व स्थळ ठरविणे अथवा त्यामध्ये बदल करणे, मुलाखत प्रक्रिया रद्य करणे या बाबत सर्व अधिकार मा.जिल्हाधिकारी, अकोला यांचे अध्यक्षतेखालील समितीला राहतील. |

**टिप - सदर जाहिरातीमधील पदसंख्या कमी जास्त होवु शकतात याबाबतचे संपुर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीला आहेत. मुलाखतीच्या दिवशी प्रत्यक्ष रिक्त असलेल्या पदाच्या संख्येनुसार पात्र उमेदवरांना मुलाखतीस बोलावण्यात येईल**

निवड समिती सचिव
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.अकोला

निवड समिती अध्यक्ष
तथा जिल्हाधिकारी अकोला जिल्हा अकोला